# भरोसा सेल व दामिनी पथकाच्या प्रभारी अधिकारी महिला पीएसआय कल्याणी पाटील यांचे डीएडच्या विद्यार्थिनींना महिलांविषयी अनेक संवेदनशील विषयावर मार्गदर्शन



धुळे (यशवर्धन देवरे,दै.धुळे दबंडी):महिला सुरक्षा कार्यक्रमा अंतर्गत धुळे जिल्हा पोलीस दल दामिनी पथक,भरोसा सेल व इंदिरा महिला मंडळ धुळे सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने पालेषा कॉलेज/ एच ओ अग्रवाल शिक्षण शाखा महाविद्यालय धुळे येथे भरोसा सेल व दामिनी पथकाच्या प्रभारी अधिकारी महिला पीएसआय कल्याणी पाटील यांनी डीएड च्या विद्यार्थिनींना महिलांविषयी अनेक संवेदनशील विषयावर मार्गदर्शन केले त्यात-१.म हिलावर होणारे अत्याचार २. स्वसंरक्षणा बाबत घ्यावयाची काळजी ३. छेडछाडीचे प्रकार ४.बाहेर फिरताना होणारी फसवणुक व त्यापासून स्वतः कसे संरक्षण करावे. ५.महिला विषय होणारे गुन्ह्यांबाबत माहिती तसेच त्यासंबंधी घ्यावयाची काळजी व सुरक्षा. ६. महिलांविषयी कायदे ७. वाळखोर मुलांपासून सतर्क राहण्याबाबत माहिती दिली, ८.सायबर क्राईम प्रकार व ते कसे टाळता येईल त्यासंबंधी काय काळजी घ्यावी. ९. पोलीस मदतीसाठी हेल्पलाइन नंबर डायल ११२ याबाबतची माहिती दिली. तसेच एल पी सी अश्विनी भालेराव यांनी विद्यार्थिनींना दामिनी पथक व भरोसा सेल संदर्भात सविस्तर माहिती दिली. इंदिरा महिला धुळे सामाजिक संस्थेच्या सचिव प्रभाजी राम धार परदेशी यांनी इंदिरा महिला मंडळ धुळे सामाजिक संस्था महिलांसाठी काय करते व गरज पडल्यास महिलांना कोणत्या पद्धतीने सहकार्य करता याबद्दल सविस्तर अशी माहिती दिली. तसेच महिलांनी सजाक, सक्षम कसे व्हावे सविस्तर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्रा.डॉ. हेमंत कुमार देवरे कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषवले व मार्गदर्शनही केले.यावेळी प्रमुख उपस्थिती व सहकार्य भरोसा सेल व दामिनी पथक अधिकारी पीएसआय कल्याणी पाटील, एएसआय चंद्रकांत शिंदे,एल पी सी धनश्री मोरे ड्रायव्हर पीसी चिराग शेख,एलपीसी मोनाली सैंदाणे, यांचे होते.कार्यक्रमाचे आयोजन डॉ.सपकाळ सर तसेच आरती सपकाळे मॅडम यांनी केले.